RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# अभ्यासक्रम पुनर्रचना व शिक्षक शिक्षण

**प्रा . गोल्हार संदिप भोजिंबा**
सहाय्यक प्राध्यापक
सौ . निर्मलाताई थोपटे शिक्षणशास्त्र
महाविद्यालय,भोर जि . पुणे .
sandipgolhar23@gmail.com
9850409299

**प्रा . गोल्हार अनुराधा संदिप**
सहाय्यक प्राध्यापक
सौ . निर्मलाताई थोपटे शिक्षणशास्त्र
महाविद्यालय, भोर जि . पुणे .
anuradhagolhar23@gmail.com
9822982970

## सारांश

*शिक्षकास केवळ आपल्या विषयाची आवड असून चालत नाही . तर आपल्या विषयाचे सखोल ज्ञान, अभिरूची, कौशल्य असणे आवश्यक असते . त्यासाठी शिक्षकास प्रशिक्षण देणे काळाची गरज बनली आहे . **19** व्या शतकापासून शिक्षकाच्या प्रशिक्षणास ख-या अर्थाने सुरूवात झाली . **1904** मध्ये शासनाने निर्णय दिला की, शिक्षक शिक्षणाचा दर्जा टिकवण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण दयावे . शिक्षक शिक्षण म्हणजे शिक्षकाच्या आधुनिक व्यावसायिक भूमिकेचा विचार करून त्याच्या ठिकाणी असलेली क्षमता अधिक विकसित करणे होय . आज शिक्षक शिक्षणात मोठया प्रमाणात समस्या निर्माण झाल्या आहेत . म्हणून आज अध्ययन, अध्यापन पध्दती, अभ्यासक्रम, मूल्यमापन यामध्ये बदल करण्याची गरज निर्माण झाली आहे .*

## प्रस्तावना

कोणताही व्यवसाय करायचा असेल . तर केवळ त्या व्यवसायाची अभिरूची, अभियोग्यता असून चालत नाही . त्या व्यवसायात काम करण्यासाठी आवश्यक ते ज्ञान, कौशल्य व दृष्टीकोन मिळवावा लागतो . शिक्षक व्यवसाय त्यास अपवाद नाही . ज्या व्यवसायातून मानवी मने घडविण्याचे कार्य होते त्यासाठी प्रशिक्षणाची गरज आहे . स्वातंत्र्यपूर्व काळात शिक्षक शिक्षणाच्या विकासाचे चार कालखंडात विभाजन केले .

शिक्षक शिक्षणाचा इतिहास

इ . सन पुर्व **2500** मध्ये ख-या अर्थाने शिक्षक शिक्षणास सुरूवात झाली .

1. प्राचीन व मध्ययुगीन काळ ( इ . सन . पूर्व **2500** ते **500**)
2. बौध्दिक काळ ( इ . सन . **500** ते **1200**)
3. मुस्लिम काळ ( इ . सन . **1200** ते **1700**)
4. बिटीश काळ ( इ . सन . **1700** ते **1947**)

**19** व्या शतकाच्या प्रारंभापासून शिक्षकाच्या शिक्षणास ख-या अर्थाने अखंडीतपणा व क्रमबध्दता आली .

**1904** चा शासन निर्णय - **1904** च्या शासकीय ठरावाने असे जाहीर केले की जर माध्यमिक शाळेतील शिक्षणाचा दर्जा वाढवायचा असेल व जर टिपणे, पाठयपुस्तके, विदयार्थी घोकंपट्टी टाळायची असेल तर शिक्षकांना अध्यापन कलेचे प्रशिक्षण दिले पाहिजे .

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

## शिक्षक शिक्षण

शिक्षक प्रशिक्षणात सर्वच शैक्षणिक प्रक्रिया समाविष्ट होतात की ज्या व्यक्तिला शाळेत शिक्षणासाठी, शिकविण्यासाठी तयार करतात. मन्रो

2. सी.व्हि.गुड्स - शिक्षक प्रशिक्षणात सर्व अनुभव औपचारिक किंवा अनौपचारिक क्रिया समाविष्ट आहेत. की ज्या व्यक्तीला शिक्षण व्यवसायाची जबाबदारी सांभाळण्यासाठी आवश्यक असलेल्या योग्यता प्रदान करतात.

3. शिक्षक शिक्षण म्हणजे शिक्षकाच्या आधुनिक व्यावसायिके भूमिकेचा विचार करून त्याच्या ठिकाणी असलेली क्षमता अधिक विकसित करण्याचे तंत्र होय.

## शिक्षक शिक्षणाची व्याप्ती

**1. सेवापूर्व प्रशिक्षण**

अध्यापन कार्य सुरू करण्यापूर्वी अगोदर जे शिक्षण दिले जाते त्यास सेवापूर्व प्रशिक्षण म्हणतात.

**2. सेवातंर्गत प्रशिक्षण**

शिक्षकाचे ज्ञान व व्यावसायिक कौशल्य अद्ययावत ठेवण्यासाठी आणि त्याची कार्यक्षमता व बांधिलकी वाढविण्यासाठी सेवाकाळात दिले जाणारे प्रशिक्षण म्हणजे सेवातंर्गत प्रशिक्षण होय.

## अभ्यासक्रम

अभ्यासक्रमांमध्ये नेहमी लवचिकता असावी व काळानुसार त्यात बदल होणे आवश्यक आहे. आजच्या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात अभ्यासक्रमात नाविन्य आवश्यक आहे.

सद्यस्थितीत शिक्षक शिक्षणात पुढील आव्हाने आहेत.

1. शिक्षक शिक्षणाचा दर्जा
2. साचेबंदपणा
3. दर्जेदार प्राध्यापक
4. अभ्यासक्रम.

तसेच पुढीलप्रमाणे समस्या आहेत.

1. संशोधन कार्य कमी प्रमाणात दिसून येते.
2. प्रशिक्षण संस्थांचा दर्जा सामान्य व नित्कृष्ठ असा आहे.
3. शिक्षक शिक्षणाचा कालावधी विविध कौशल्यांचा विकास करण्यास पुरेसा नाही.
4. प्रशस्त क्रिडांगण, ग्रंथालय, संगणक इत्यादी सुविधांची कमतरता दिसून येते.
5. शिक्षक शिक्षणात दीर्घ नियोजनाचा अभाव दिसून येतो.
6. अभ्यासक्रमात पारंपारिकता दिसून येते.
7. प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमात चैतन्य व वास्तविकता यांचा अभाव आहे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

## शिक्षक शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी

**1. संशोधनावर भर**

शिक्षक शिक्षणात संशोधन कार्यास प्राधान्य असावे. संशोधनाशी निगडीत अभ्यासक्रमात भर असावा.

**2. प्रात्यक्षिक कार्यावर भर**

प्रत्येक विषयाशी निगडीत प्रात्यक्षिक कार्यात कृतीचा समावेश असावा. जेणेकरून विदयार्थी विचारांना चालना मिळेल.

**3. कौशल्याचा विकास**

अभ्यासक्रमामुळे विदयार्थी कौशल्याचा विकास अपेक्षित आहे.

**4. व्यक्तीला सक्षम बनविणारा**

अभ्यासक्रमामुळे व्यक्तीला आत्मविश्वास निर्माण व्हावा.

**5. नवीन अध्यापन पध्दती**

अभ्यासक्रमात नवीन अध्यापन पध्दतीचा समावेश करावा.

उदा. सांघिक अध्यापन, गटचर्चा, संगणक सहाय्यित अध्यापन.

**6. मूल्यमापनाचे नवप्रवाह**

मूल्यमापनाच्या नविन प्रवाह, नविन पध्दती यांचा अभ्यासक्रमात समावेश करावा.

उदा. ऑनलाईन परीक्षा, श्रेणी पध्दती, मुक्त पुस्तक परीक्षा, मागणीनुसार परीक्षा

**7. अदयावत अभ्यासक्रम**

अभ्यासक्रमात नाविन्य असावे दैनंदिन जीवनात उपयुक्त असणारा असावा. अभ्यासक्रमात संगणक आधारित अध्यापनाचा समावेश असावा.

**8. सर्वांगिण विकास**

अभ्यासक्रमातून विदयार्थ्यांचा बौध्दिक, भावनिक व क्रियात्मक विकास होईल असा असावा. यासाठी कृती, प्रकल्प, प्रयोग, सहशालेय उपक्रम इत्यादीचे आयोजन केले जावे.

## शिक्षक शिक्षण गुणवत्ता वाढीसाठी उपक्रम

**उपक्रम**

1. सहशालेय उपक्रमांचे आयोजन
2. व्यक्तीभेद जाणून मार्गदर्शन
3. अध्यापनात तंत्रज्ञानाचा वापर
4. सैध्दांतिक व प्रात्यक्षिक भागाचे एकात्मिकरण
5. अभ्यासक्रमाची पुर्नरचना करणे
6. शिक्षक शिक्षणातील समस्यांचे संशोधनात्मक अभ्यास करणे
7. शिक्षकांना प्रशिक्षण देणे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

## समारोप

अशा प्रकारे शिक्षक शिक्षणाच्या गुणवत्ता वाढीसाठी प्रशिक्षित शिक्षक, नवनवीन आव्हाने अध्यापन पध्दती यांचा वापर करणे आवश्यक आहे.

## संदर्भ


1. विचुकले बी.एस, सांगळे ए.जी, (2011) "शिक्षक शिक्षण श्री प्रकाशन पुणे.
2. कक्कड गुरूप्रसाद, गायकवाड शशी (1995) "शिक्षक व अध्यापक शिक्षण", नूतन प्रकाशन, पुणे.
3. पारसनिस न.रा. (1987) "शिक्षणाची तात्विक व समाजशास्त्रीय भूमिका" नूतन प्रकाशन. पुणे. 30.
4. पारसनिस न.रा. (1993) "शिक्षकाचे प्रशिक्षण" नूतन प्रकाशन, पुणे - 30.
5. शिवणेकर ल.मा. (1992) "माध्यमिक शिक्षण संरचना व कार्यपध्दती" नूतन प्रकाशन, पुणे - 30.
6. वरखेडे रमेश नारायण (2004) "स्वातंत्र्योत्तर कालखंडातील शिक्षण" य.च.म.मु.वि., नाशिक.
7. तापकीर, मिसाळ (2008). "शिक्षणशास्त्र मार्गदर्शक" व्हिजन ॲकॅडमी, पुणे.